




साप्ताहिक

www.dongarcharaja.com

वडवणी तालुक्यातील पहिले मराठी वृत्तपत्र

# डोंगरचा राजा

संपादक : अनिल वाघमारे








■ वर्ष १० ■ अंक ४३ ■ बुधवार, दि. २३ एप्रिल २०२५ ■ RNI No. : MAHMAR/2015/62614 ■ पोस्टल परवाना : L. SB/Beed/RNP-219/2024-2026 ■ email:dongarcharaja@gmail.com ■ पाने ४ ■ किंमत १ रु.





रमेशराव आडसकर, नगराध्यक्ष सीताताई बनसोड, अंकुशराव इंगळे, हारून इनामदार, ऋषी आडसकर यांनीही केला प्रवेश

# रमेशराव आडसकर : नवा वेळ, नवा खेळ,नवी सुरुवात

डोंगरचा राजा विशेष वृत्त..

बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार झाल्यानंतर जिल्ह्यात अजित पवार गटाला अच्छे दिन येतील असा कयास राजकीय जाणकारांनी लावला होता. तो आता खराच ठरला असे म्हणावे लागेल. माजलगाव विधानसभा मतदारसंघ आणि केज विधानसभा मतदारसंघाचे नेते रमेशराव आडसकर सह इतरांनी अजित पवार गटात एका महत्वपूर्ण कार्यक्रमात पक्ष प्रवेश केल्याने जिल्ह्यात इतर पक्षापेक्षा पालकमंत्री अजित पवार गटाची राजकीय ताकद वाढली असेच म्हणावे लागेल.

पालकमंत्री अजित पवार यांनी बीड जिल्ह्यातील सहाही विधानसभा मतदारसंघात पक्षाची सदस्य संख्या वाढवण्याचा सल्ला देताना निधी पाहिजे तेवढा दिला जाईल मात्र त्याचा योग्य वापर झाला पाहिजे अन्यथा कोणत्याही पक्षाचा आमदार नेता असला तरी गय करणार नाही असेही नम्रपणे सांगितले.

माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे नेते रमेशराव आडसकरांनी यापूर्वी भाजपमध्ये प्रवेश केला होता. त्यांना विधानसभेची माजलगाव ची उमेदवारी हवी होती. मात्र ती मिळाली नाही. त्यांनी विधानसभेच्या

तोंडावर राष्ट्रवादी शरद पवार गटात प्रवेश केला. त्या ठिकाणी त्यांचे परंपरागत मित्र जिल्ह्याचे विद्यमान खासदार बजरंग सोनवणे होते. तरीही त्यांनी त्या गटात प्रवेश केला. मात्र त्यांना माजलगाव विधानसभा मतदारसंघाची उमेदवारी मिळू शकली नाही. मात्र त्यांनी विधानसभा निवडणूक लढवली पराभूत झाले.

त्यांनी सध्या अंबा कारखान्याकडे लक्ष केंद्रित केले असल्याचे समजते. केंद्राचा निधी मंजूर होऊन मिळत नव्हता. आता पुन्हा एकदा पालकमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटात रमेशराव आडसकर यांनी प्रवेश केला आहे. या प्रवेश सोहळ्यात त्यांच्यासोबत

नगराध्यक्ष सीताताई बनसोड, अंकुशराव इंगळे, हारून इनामदार, ऋषी आडसकर व इतर महत्वपूर्ण असणारे पदाधिकारी व कार्यकर्ते एकत्र येऊन पक्ष प्रवेश केला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार हे आता बीड जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत. रमेशराव आडसकर आणि त्यांच्या सोबत असणारे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते एकत्र आल्याने बीड जिल्ह्यात अजित पवार गटाची ताकद इतर राजकीय पक्षापेक्षा पावरफुल झाल्याचे दिसत आहे.




# संपादकीय

## गुंतवणूकसंधी

सोन्याच्या भावाच्या चढत्या आलेखाने सोमवारी एक लाख रुपयांची ऐतिहासिक पातळी पार केली. गेल्या काही महिन्यांपासून सोने भाव खात होते. यामुळे क्रयशक्ती नसणाऱ्यांपासून ते दूर जात आहे, तर गुंतवणूकदारांना परतावा देत आहे. जानेवारीपासूनच्या साडेचार महिन्यांत या धातूने १९ हजारांचे ‘रिटर्न गिफ्ट’ गुंतवणूकदारांना दिले आहे. गेल्या १० ते १२ दिवसांत सोन्याचे भाव सुमारे आठ हजार रुपयांनी वाढले. रशिया–युक्रेन यांच्या युद्धापाठोपाठ इस्रायल–हमास संघर्ष, चीनचा विस्तारवाद, बँकांचे व्याजदर धोरण, संभाव्य मंदीमुळे ‘गोल्ड ईटीएफ’मध्ये होणारी गुंतवणूक आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या महत्त्वाकांक्षी आयातशुल्कवाढीचे बेभरवशी राजकारण यांमुळे जागतिक परिस्थिती नाजूक बनली आहे. अशांतता आणि अस्थिरता वाढली आहे. त्यातच डॉलर कमकुवत होतोय आणि महागाई वाढते आहे. अशा स्थितीत गुंतवणूकदारांनी सुरक्षिततेसाठी सोन्याला जवळ केलेले दिसते. त्यामुळे सोन्याची मागणी वाढत असून, जगभरातील मध्यवर्ती बँकांनीही सोनेखरेदीवर भर दिला आहे. परिणामी, सोन्याच्या दरांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. इतकी की चालू वर्षात आतापर्यंत सोन्याच्या भावात २६ टक्के वाढ झाली आहे. दहा ग्रॅम सोन्याला एक लाख रुपयांवर भाव येण्यामागे ही पार्श्वभूमी आहे.

भारतातील परिस्थिती वेगळी नाही. देशांतर्गत शेअर बाजारांमध्ये मोठ्या प्रमाणावर चढउतार सुरू असून, सामान्य गुंतवणूकदार धास्तावला आहे. जागतिक घटनांचे पडसाद म्हणून बाजारांमध्ये मोठ्या प्रमाणावर पडझडही दिसली. त्यातच रुपयाचे अवमूल्यन होत असल्याने आयातदारांचे धाबे दणाणले आहे. डॉलरच्या तुलनेत रुपया कमकुवत झाल्यास देशातील सोन्याची आयात खर्चिक होते. त्यामुळे त्याचा थेट परिणाम सोन्याच्या दरावर होतो. केंद्र सरकारने सोन्यावरील आयातशुल्क वाढविल्यामुळे दरवाढीत ‘तेल’ ओतले गेले. याशिवाय देशातील लग्नसराईचा हंगाम सुरू झाला असल्याने मागणीत मोठी वाढ झाली आहे.

भारत हा जगातील सर्वांत मोठा सोने आयातदार देश असून, येथे सोनेखरेदी केवळ हौसमौज म्हणून नव्हे, तर तर संस्कृतीचा, परंपरेचा आणि सामाजिक प्रतिष्ठेचाही भाग मानली जाते. एप्रिल ते जून या लग्नसराईच्या कालावधीत सोन्याची मागणी नेहमीच वाढते. यंदा विवाहांची संख्या अधिक असल्याने दागिने विक्रेत्यांकडे मागणीचा प्रचंड ओघ आहे. या वाढत्या मागणीमुळे अन्य गुंतवणूक साधनांपेक्षा सोने वरचढ ठरत आहे. साधारणत: करोना साथरोगाच्या काळापासून सोन्याच्या दराचा आलेख उंचावत आहे. आर्थिक संकटकाळात हाताशी असलेले सोने विकून पैसा उभा करता येतो, या भावनेतून या मौल्यवान धातूची खरेदी केली जाते. त्यामुळे दिवसेंदिवस दरवाढ होत असतानाही मिळणाऱ्या परताव्यामुळे सोन्यावरील प्रेम आटलेले नाही.

सोने आत्ता एक लाख रुपयांवर गेले असले, तरी चांदीने एक किलोसाठी हा पल्ला २८ मार्चलाच गाठला होता. अवघ्या तीनच महिन्यांत चांदीनेही १२ हजार रुपयांचा परतावा दिला आहे. ट्रम्प यांनी आयातशुल्काची घोषणा केल्याचा थोडा फटका चांदीला बसलेला दिसतो. चांदीचे औद्योगिक वापराशी (विशेषतः इलेक्ट्रॉनिक्स आणि सौरऊर्जा) असलेले घट्ट नाते जागतिक आर्थिक वाढीच्या चिंतेमुळे किमतीवर परिणाम करीत आहे. सध्याची जागतिक अस्थिरता कमी होईपर्यंत सोन्याचे दर काही काळ स्थिर राहण्याऐवजी वाढतच जातील. आर्थिक घडामोडी व महागाईचा कल लक्षात घेता पुढील वर्षाच्या मध्यात सोन्याचा दर सव्वा लाख रुपयांवर जाण्याची शक्यताही जाणकार व्यक्त करीत आहेत.

काही जागतिक तज्ज्ञांनी, येत्या दोन वर्षांत सोने प्रतितोळा दोन लाख रुपयांवर जाण्याचा अंदाज वर्तवला आहे. सोन्याचे वाढते दर प्रामुख्याने आंतरराष्ट्रीय बाजार, आर्थिक परिस्थिती, स्थानिक चलनमूल्य, करधोरणे आणि मागणी यांवर अवलंबून असतात. त्यामुळे सध्याची दरवाढ हा काळजीचा विषय नसून, बाजारांतील घडामोडींचा परिपाक आहे. ऐन लग्नसराईत जरी मोठी दरवाढ झाली असली, तरी सोन्याचे आकर्षण कमी होण्याची शक्यता नाही. कारण, दरवाढीचे चटके सहन करून भारतीय सोनेखरेदी करतात, हा आजवरचा इतिहास आहे. भारतीय संस्कृतीचा एक झळाळता वारसा म्हणून मिळविणाऱ्या सोने सध्या तरी गुंतवणूकदारांसाठी संधी घेऊन आले आहे, यात शंका नाही.

# विश्वास पात्र संस्था असल्यानेच मी उदघाटनास आलो :ना.बाबासाहेब पाटील



तेलगाव:प्रतिनिधी

आमदार, मंत्री यांच्या हस्ते पतसंस्थेचे उदघाटन केल्यास त्याचा संस्थेला फायदा होतो.म्हणुन अनेक संस्था चालक मुद्दाम आम्हाला उदघाटनास बोलावतात. त्यामुळे मी पतसंस्थेच्या उदघाटनास जात नाही.परंतु लोकनेते सुंदररावजी सोळंके पतसंस्था लोकांच्या विश्वास पात्र संस्था असुन, या संस्थेचा अल्पवधीतच चांगला आर्थिक कारभार असल्यानेच मी या उदघाटन समारंभास उपस्थित राहीलो. असे प्रतिपादन व्यक्त करत जी संस्था जास्त व्याज दर देते तेथे धोका जास्त. त्यामुळे लोकांनीही आपल्या कष्टाचे पैसे ठेवताना जास्त व्याजाच्या मागे लागता विश्वास पात्र संस्थेत पैसे ठेवी ठेवाव्यात. असे आवाहन राज्याचे सहकार मंत्री ना.बाबासाहेब पाटील यांनी तेलगाव येथे आयोजित कार्यक्रमात बोलताना केले.

तेलगाव ता.धारूर येथील सुंदरनगर परिसरात लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी नागरी पतसंस्थेच्या सुसज्ज नुतन इमारतीचा व तेलगाव शाखेचा उदघाटन समारंभ दि.२१ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आला होता.याचे उदघाटन महाराष्ट्राचे सहकार मंत्री ना.बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.या भव्यदिव्य व शानदार समारंभाच्या अध्यक्षस्थानी नारायण बाबा संस्थान, वांगीचे अध्यक्ष ह.भ.प.एकनाथ माने होते.तर प्रमुख उपस्थितीत आ.प्रकाश दादा सोळंके,पाहुणे म्हणुन बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक, जिल्हा निबंधक समृत जाधव,पतसंस्था फेडरेशनचे महाराष्ट्र अध्यक्ष काकासाहेब कोयटे, कारखान्याचे कार्यकारी संचालक रविंद्र बडगुजर,बुलढाणा बॅकेचे विभागीय संजय देशमुख आदिसह स्वागताध्यक्ष कारखान्याचे चेअरमन विरेंद्र सोळंके, व्हा.चेअरमन जयसिंह सोळंके, दिनबंधु महिला पतसंस्थेच्या चेअरमन ॲड. पल्लवीताई विरेंद्र सोळंके उपस्थित होत्या.कार्यक्रमाच्या प्रारंभी लोकनेते स्व सुंदररावजी सोळंके यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण पुजन करण्यात आले.याप्रसंगी उपस्थितीतांना संबोधित करताना ना.बाबासाहेब पाटील म्हणाले की,सहकार चळवळीमुळे अनेक चांगले काम होतात. सहकार चळवळीत ९५टक्के लोक चांगले काम करतात. परंतु जे ५ टक्के लोक आहेत त्यांच्यामुळेच सहकार चळवळ बदनाम होत असुन, याचे उदाहरण म्हणजे अशा पाच टक्के लोकांमुळेच बीडचे नाव सहकार क्षेत्रात राज्यात बदनाम झाले. धनंजय महाडिक व त्यांच्या इतर सहकाऱ्यांनी महाराष्ट्रात लावलेले सहकार चळवळीचे वृक्ष आज डेरेदार झाले असुन,यामुळे महाराष्ट्राचे नाव देशात झाल्याचे ना.पाटील यांनी सांगत बिहार मध्ये निसर्गाने सर्व कांही दिले.परंतु त्या राज्यातील राज्यकर्त्यांनी सहकार चळवळीस महत्त्व न

दिल्याने तेथील हजारो बेरोजगार तरुण आपल्या महाराष्ट्रात रोजगारासाठी येत असल्याचे त्यांनी म्हटले.तसेच साखर उद्योगात ही सहकार महर्षी विठ्ठलराव विखे पाटील यांनी सहकार चळवळीतुन निर्माण केलेल्या साखर कारखान्याने प्रगती केल्याचे स्पष्ट करत सहकार चळवळीतुन चांगलेच निर्णय होतात. हे.ही ना.पाटील यांनी यावेळी सांगितले.पुढे त्यांनी म्हटले की,लोकनेते सुंदररावजी सोळंके यांचे कार्य लोकहिताचे होते.त्यांनी महाराष्ट्रात अनेक ठिकाणी लोकहिताची कामे केली.त्याच प्रमाणे त्यांचे राजकारणातही वजन होते.त्या काळी थोडे कांही खालीवर झाले असते तर ते राज्याच्या प्रमुख पदावरही बसले असते.वक्तव्य करून पुढे ते म्हणाले की,गेल्या चार वर्षांपासून माजलगावच्या सहकार क्षेत्रात सक्रिय असलेल्या लोकनेते सुंदररावजी सोळंके पतसंस्थेचा ऑडिट वर्ग चांगला असुन,या संस्थाची आर्थिक उलाढाल ही चांगली संस्थेत ३५ कर्मचारी वर्ग असुन, ही संस्था ग्राहकांच्या,लोकांच्या विश्वास पात्र ठरली.मुळात आ.प्रकाश दादा सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली ही संस्था कार्यरत असुन, आ.दादा हे सहकारातील जुने, जाणते व अभ्यासु नेते आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेची वाटचाल असल्याने ती योग्य दिशेनेच होणार यात तीळमात्र शंका नसल्याचे स्पष्ट करत,आ.दादाच्या मार्गदर्शनाखाली भविष्यात ही संस्था बीड जिल्ह्यातच नव्हे तर राज्यात एक आदर्श पतसंस्था म्हणून नावलौकिक प्राप्त करणार असल्याचे गौरवोद्गार ना.बाबासाहेब पाटील यांनी व्यक्त उकेले.तसेच बीड जिल्ह्यातील कांही पतसंस्थेत झालेल्या गैरव्यवहारामुळे लोकांच्या ठेवी बद्दल बोलताना ना.पाटील यांनी आगामी काळात सहकार आयुक्त यांच्या नेतृत्वाखाली समिती स्थापन करून, त्या सर्व पतसंस्थेच्या सखोल चौकशी करून, लोकांचे पैसे, ठेवी परत देण्या बाबत प्रयत्न केले जातील. असे म्हटले.तर आपल्या भाषणात आ.प्रकाश दादा सोळंके म्हणाले की,सोळंके पतसंस्थेचा अल्पवधीतच कारभार चांगला असुन, या संस्थेने सहा हजार सभासदांच्या सहकार्याने मोठी मजल मारली असुन,संस्थेत ठेवलेल्या ठेवीची विश्वस्त म्हणून संचालकांची जबाबदारी आहे.तसेच

कर्ज वाटप करणे व कर्ज वसुली याचे कर्तव्य ही संचालकांचे असुन, पतसंस्था चालवणे मोठे आवाहन पतसंस्थेचा पैसा बीड जिल्ह्यातील कांही पतसंस्था चालकांनी स्वत:साठी वापरल्याने नागरिक अडचणीत आले असुन, यावर सहकार मंत्री यांनी यावर मार्ग काढून, जिल्ह्यातील नागरिकांचे पैसे, ठेवी परत द्याव्यात. अशी मागणी आ.सोळंके यांनी केली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ.पल्लवीताई विरेंद्र सोळंके यांनी करून, यात गेल्या चार वर्षांत संस्थेने केलेली यशस्वी वाटचाल याबद्दल सांगत संस्थेचे सहा हजार सभासद इतरही बाबतीत संस्थेचा आढाव घेतला.यावेळी जिल्हाधिकारी अविनाश पाठक, जिल्हा निबंधक समृत जाधव यांचेही भाषण झाले.आभार संस्थेचे मुख्यकार्यकारी अधिकारी सुहास सोळंके यांनी मानले.कार्यक्रमास संस्थेचे सभासद, ग्राहकांसह असंख्य नागरिक उपस्थित होते.

## आगे कुटुंबियांना पंकजाताई मुंडेंनी दिला मायेचा आधार

बीडः भाजपचे जिल्हा विस्तारक स्व. बाबासाहेब आगे यांच्या कुटुंबियांशी राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी दुपारी दूरध्वनीवरून संवाद साधला. आगे कुटुंबाला आर्थिक मदत करत त्यांच्या पत्नीला नोकरी मिळवून देण्याचा शब्द त्यांनी दिला. बीडच्या पुढील दौऱ्यात आपण आगे परिवाराची प्रत्यक्ष भेट घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.ना. पंकजाताई मुंडे आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमवेत घाटशीळ पारगाव येथे नारळी सप्ताहात उपस्थित होत्या. नियोजित दौर्यानुसार त्या किट्टी आडगाव येथे जाऊन स्व. बाबासाहेब आगे यांच्या परिवाराला भेटणार होत्या परंतू अचानक मिटिंगसाठी मुंबईला जावे लागल्याने त्यांच्या सूचनेनुसार भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी भाजपच्या पदाधिकाऱ्यां समवेत आगे परिवाराची त्यांच्या घरी जावून भेट घेतली.



बीड येथील श्री.बबनराव मस्के यांचा वाढदिवस ढेकनमोहा पसयादान सेवा प्रकल्प येथील अनाथ मुलांबरोबर साजरा केला. निश्चितच अनाथांच्या सोबत वाढदिवस साजरा करण्यात एक वेगळाच आनंद मिळतो. हा वाढदिवस साजरा करण्यासाठी या सेवा प्रकल्पाचे मुख्य असणारे आमचे स्नेही मित्र गोवर्धन चंद्रभागा निवृत्ती दराडे यांचं सहकार्य लाभले.येथील मुलांना शालेय साहित्य तसेच खाऊ चे गिफ्ट वाटप करण्यात आले. आमची भगिनी शिक्षिका मिना उर्फ चंदा बबनराव मस्के यांनी हा योग घडवून आणला. अनाथांच्या सोबत मस्त गप्पा झाल्या. यावेळी सौ.अनुराधा अनिल वाघमारे, युवराज गाडे,सौ.वंदना गाडे, कु.प्राजक्ता मस्के आणि इतर सर्वजणांनी हा वाढदिवस सेलिब्रेट केला.

## समज आणि गैरसमज



आपल्याला आपल्या आजाराबद्दल सारे काही समजते, असा पुष्कळांचा गैरसमज असतो. डॉक्टरांच्या कक्षात येवून आपल्या तक्रारी असे पेशंट सांगतात. स्वत:च स्वत:च्या आजाराचं निदानही करून टाकतात आणि काय काय तपासण्या करायच्या तेही तेच सांगून टाकतात. डॉक्टरांचे काम हलके करून टाकतात, म्हणजे डॉक्टरांना फक्त प्रिस्क्रीप्शन’ लिहून देण्याचेच काम उरते! खरे तर, मनुष्य स्वभावाबद्दल आणि त्याच्या आजाराबद्दल अजून बरेच संशोधन व्हायचे आहे. त्यामुळे प्रॅक्टीस करणारे डॉक्टर्सही प्रांजळपणे कबूल करतात की, आमच्या पॅथीमध्ये अजूनही खुप संशोधन व्हायचे आहे. थोडे झाले आणि बहूत काही व्हायचे आहे, हे मान्य करायला डॉक्टरांना काही कमीपणा वाटत नाही. प्रस्तूत लेखांत पेशंट्सचे आपल्या आरोग्याबद्दल खुप काही गैरसमज असतात, त्यातला डॉक्टरला सारे काही समजते हा एक गैरसमज. डॉक्टराला बरेच काही समजते, तरी सर्वकाही समजते असे नाही. दोन सारख्याच आजाराचे पेशंट असलेत, तरी दोघेही ठराविक वेळातच दुरूस्त होतील, असा अंदाज बांधता येत नाही. दोन सिरीयस पेशंट्स असलेत, तरी त्यांचे भाग्य वेगवेगळे असते. तेव्हा डॉक्टर हा दैववादी असतो असे नाही, पण तरी तो देवावर विश्वास ठेवतो. कारण देवच चमत्कार घडवून आणू शकतो, डॉक्टर नाही.

आजकाल इंटरनेटवर सारी काही माहिती मिळते आजाराबद्दलचे सारे ज्ञान इंटरनेट सांगते, ते सारे प्रत्येक पेशंटला लागू पडतेच, असे नाही. त्यात रोगांची लक्षणे आणि त्या लक्षणांवरून निदान असे डॉक्टर्स ठरवितात. त्या निदानासाठी (डायग्नोसिस) डॉक्टर्स काही तपासण्या करून घेतात आणि त्याप्रमाणे औषध योजना करतात. इंटरनेटमधून माहिती घेणारे पेशंट्स व त्यांचे नातेवाईक समोर बसलेल्या डॉक्टरकडे संशयाने पाहतात.

बरेचसे पेशंट व त्यांचे नातेवाईक डॉक्टरकडून साऱ्या तपासण्या करून घेण्याचा आग्रह करतात कारण त्यांना ह्या तपासण्यांबद्दल माहिती मिळालेली असते. खेड्यातून आलेला पेशंटसुद्धा एक्सरे काढून घ्या, सोनोग्राफी करून घ्या, असा हट्ट धरतात. साधी डोकेदुखी असली की सिटी स्कॅन करून घ्या म्हणतात. ह्या साऱ्या तपासण्यामधून पुष्कळदा काहीच निष्पन्न होत नाही. वास्तविक डॉक्टरच ठरवितो, कुठल्या रोगाला कुठल्या तपासण्या आवश्यक आहेत. पण कधी पेशंट्सचा हट्ट पुरवावा लागतो. एकीकडे डॉक्टर्स फार तपासण्या सांगतात ही ओरड असते, तर दुसरीकडे तपासण्यांचे चार्जेस आम्ही भरतो, तुमचे काय जाते? असा युक्तीवाद असतो. साऱ्या तपासण्यांमधून डायग्नोसिस लिहूनच येते असा काहींचा गैरसमज, तर एवढ्या तपासण्या करूनही डॉक्टरला काहीच गवसले नाही, असा काहींचा समज.

काही पेशंट सारे सांगितलेले आज्ञाधारक मुलासारखे ऐकून घेतात व त्याप्रमाणे तपासण्या करून घेतात. लिहून दिलेल्या औषधीही घेतात. काही जण डॉक्टरांच सर्व ऐकून घेतात आणि स्वत:च्या मनासारखं करतात. काही पेशंट गिर्हाईकांसारखं मार्केटिंग करतात. चार डॉक्टरांना दाखवून तपासून घेतात व त्यांना जे सोयीचे वाटते, त्या डॉक्टरचे औषध घेतात. तात्पर्य, व्यक्ती तितक्या प्रकृती म्हणतात तेच खरे.

एकेकाळी अनेक गैरसमजांवर आणि अंधश्रद्धांवर आधारलेलं औषधीशास्त्र आज समजलेल्या कारणांवरून तयार करण्यात आलं आहे. कंटाळा येईपर्यंत जगण्याची मुभा या शास्त्राने दिली आहे. मात्र, पेशंटचे सहकार्य मिळाले, तर डॉक्टरचे काम सुकर होईल. डॉक्टरांच्या तपासण्या, प्रयोगशाळेतल्या तपासण्या ह्या पेशंटच्या ट्रीटमेंटसाठीच असतात व ट्रिटमेंट ही पेशंटला बरे करण्यासाठी असते, हा विश्वास असला की बरेचसे समज आणि गैरसमज नक्कीच दूर होतील.

## पुन्हा मिळवा आत्मविश्वास

काही माणसं समोर आली की आपल्याला चटकन त्यांना टाळण्याच्या युक्त्यांचा विचार करावंसं वाटतं. थोडं तपशीलात शिरून पाहिलं तर लक्षात येतं की, अनेकदा ही माणसं आपल्याशी बोलताना रटाळ, प्रत्येकाविषयीची नकारात्मक मतंच ऐकवत असतात. त्यामुळे जगात काहीच चांगलं नाही, जग विश्वासघातकी–वाईट लोकांनीच भरलेलं आहे अशी भावना मनात निर्माण होऊ लागते. परंतु नकारात्मकता हा एक मानसिक आजार आहे. प्रत्येकाविषयी, प्रत्येक घटनेविषयी भीती, अविश्वास किंवा शंका यांमधून तो उद्भवतो. त्याची मुळं सहसा आलेल्या काही वाईट अनुभवांचा प्रभाव मनावरून पूर्णपणे पुसून टाकून मन पुन्हा प्रसन्न करण्यात आलेल्या अपयशात दडलेली असतात. आत्मविश्वासाचा अभाव असल्यामुळे इतरांनी आपल्यावर मारलेले शेरेच खरे धरल्यामुळे इतर लोकांविषयी मनात राग निर्माण झालेला असतो. परिणामी, प्रत्येक व्यक्तीचं वागणं, बोलणं या मानसिक रुग्णाला आपल्या विरोधात असल्यासारखं वाटतं. आपल्या बाबतीत काहीच चांगलं घडणार नाही असं वाटू लागतं. कधी तरी लागोपाठ आलेल्या अपयशाच्या अनुभवातून यापैकी काही लोक पूर्णपणे सावरू शकलेले नसतात. यासाठी अर्थातच समुपदेशन आणि मित्र आणि जवळच्या मंडळींनी त्यांचे गैरसमज दूर करण्यासाठी संवाद साधणं हे उपचार आहेत. पेला अर्धा भरलेला की अर्धा रिकामा हे नेहमीचं उदाहरण या व्यक्तींबाबत नेहमीच दिलं जातं. अशा रुग्णांचं मन शांत करण्यासाठी काही औषधं दिली जातात. मनातील विचार काढून आत्मविश्वास बळावला जावा यासाठी मानसोपचार केले जातात. ध्यानधारणा, योग, शांत, प्रसन्न वातावरणात राहणं, फिरणं, जिथे आपल्यावर टीका केली जाणार नाही अशा लोकांच्या सानिध्यात अधिक काळ राहणं हे यासंदर्भात उपाय ठरू शकतात. अपयशावर मात करण्यासाठी पुन्हा पुन्हा प्रयत्न करण्यास प्रवृत्त व्हावं यासाठी त्यांना सतत प्रेरणा देत राहण्याचाही उपचारांमध्ये समावेश होतो. एखादं किरकोळ यशही त्यांना पुन्हा आत्मविश्वास प्राप्त करून देण्यास पुरेसं ठरतं.

साप्ताहिक
# डोंगरचा राजा
बुधवार, दि. २३ एप्रिल २०२५ । पान ३

## डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृहतील विद्यार्थ्यांचे काय ? शिवसंग्राम चा सवाल

बीड( प्रतिनिधी)जिल्हा वार्षिक योजना व विकास निधी २०२५-२६ अंतर्गत नाविन्यपूर्ण व शाश्वत विकास ध्येय कार्यक्रमाअंतर्गत तारांगण व इन्क्युबेशन सेंटर उभारणीची घोषणा उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री मा. ना. अजित दादा पवार यांनी केली असून यासाठी बीड येथील कै. विनायकराव मेटे शासकीय औद्यागिक प्रशिक्षण संस्था, नगर रोड, बीड येथील तीन एकर जागेवर तारांगण व दोन एकर जागेवर इन्क्युबेशन सेंटर प्रस्तावित केले आहे. यासाठी येथील मुलांचे वसतीगृह आणि विविध कार्यशाळाच्या इमारती जमीनउद्ध्वस्त केल्या जाणार आहेत. त्यामुळे वसतिगृहातील विद्यार्थी आणि या ठिकाणी शिकत असलेल्या विद्यार्थ्यांचे नुकसान होणार आहे. तारांगण व इन्क्युबेशन सेंटर चे स्वागतच आहे.

# छेडछाड करणाऱ्याची गाठ पोलिसांशी

## डॉ.निलम गोऱ्हे यांचा इशारा; बीडमध्ये साक्षी कांबळेच्या कुटूंबीयांची घेतली भेट

बीड :प्रतिनिधी

धाराशिव येथे मामाच्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केलेल्या साक्षी कांबळे प्रकरणात विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी आज बीडमध्ये पीडित कुटुंबीयांची भेट घेतली. या भेटीदरम्यान डॉ. गोऱ्हे यांनी कुटुंबीयांच्या मागण्या ऐकून घेत त्यांना मानसिक आधार दिला, तसेच दोषींवर कठोर कारवाई करण्याचा विश्वास दिला.

या प्रकरणातील आरोपीस जामीन मिळाल्याने कुटुंबात संतापाची लाट उसळली आहे. धाराशिव पोलीस न्यायालयात आरोपीचा जामीन रद्द करण्यासाठी अपील दाखल करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. डॉ. गोऱ्हे म्हणाल्या की, ''एफआयआर आधीच नोंदवण्यात आला असून, आता पूरक जबाब घेतला जाणार आहे. याप्रकरणात दोषींना पाठीशी घालणाऱ्यांवरही कारवाई केली जाईल.''

महाविद्यालयीन आणि शालेय विद्यार्थिनींना त्रास देणाऱ्यांबाबत त्यांनी स्पष्ट इशारा दिला की, ''अशा त्रासदायक प्रकारांची गाठ थेट महाराष्ट्र पोलिसांशी आहे. कोणी त्रास देत असेल, छेडछाड करत असेल तर मुलींनी तात्काळ पोलिसांकडे किंवा विश्वासू कार्यकर्त्यांकडे तक्रार करावी.''कुटुंबीयांनी मांडलेल्या मागण्यांमध्ये संबंधित पोलीस अधिकाऱ्यांचे वर्तन, जातीय भेदभावाचे आरोप आणि कारवाईत दिरंगाईचे मुद्दे उपस्थित करण्यात आले. डॉ. गोऱ्हे यांनी हे सर्व मुद्दे राज्याच्या वरिष्ठ नेतृत्वापर्यंत पोहोचवले असल्याचे सांगत, ''मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनाही मी ही माहिती कळवली आहे. संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष या प्रकरणाकडे लागले आहे.''

डॉ. गोऱ्हे यांनी यावेळी सांगितले की, ''साक्षीचा विवाह ठरलेला होता, ती आनंदात होती. तरीही कॉलेजमधील



त्रासामुळे तिचा जीव गेला. अशा 'टारगट मुलां'वर कठोर कारवाई व्हावी यासाठी मी स्वतः पोलिसांशी चर्चा केली आहे. कोणी आरोपीला संरक्षण देत असेल तर त्यांच्या विरोधातही कारवाई करण्यात येईल.''

शेवटी, त्यांनी राज्यातील सर्व मुलींना आवाहन करत सांगितले की, ''कोणी तुम्हाला त्रास देत असेल, तुमचे फोटो, व्हिडिओ चुकीच्या पद्धतीने वापरत असेल, तर भयभीत न होता पोलिसांशी संपर्क साधा. सायबर गुन्ह्यांची सुद्धा तक्रार करा. संपूर्ण यंत्रणा तुमच्या पाठिशी आहे.''

या भेटीदरम्यान बीडचे जिल्हाधिकारी श्री. अविनाश पाठक, पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कावत, शिवसेना मराठवाडा सचिव श्री. अशोक पटवर्धन, महाराष्ट्र राज्य महिला आयोग सदस्य, शिवसेना संपर्कप्रमुख ॲड. संगीता चव्हाण, जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन मुळूक, स्वप्नील गलदर, महिला जिल्हाप्रमुख रत्नमाला आंधळे, युवासेना रविराज बडे आणि अन्य कार्यकर्ते उपस्थित होते. साक्षीच्या आत्महत्येप्रकरणी सरकार आणि पोलीस प्रशासन ठोस पावले उचलत असल्याचे उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी यावेळी म्हटले.

# वडवणीचे गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरेंना पद्मपाणी राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

## शिक्षणासाठी झिजणाऱ्या सर्वांना पुरस्कार समर्पित

वडवणी:प्रतिनिधी

बीड जिल्ह्याच्या शिक्षण क्षेत्रात वडवणी तालुक्याची उत्तुंग भरारी घेणारे वडवणी तालुक्याचे कर्तव्यदक्ष तथा कार्यतत्पर गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे यांना प्रतिष्ठेचा पद्मपाणी राज्यस्तरीय पुरस्कार २०२५ (उत्कृष्ट प्रशासक) हा नुकताच जाहीर झाला असून या पुरस्काराबध्दल त्यांच्यावर शिक्षण क्षेत्रासह सर्व स्तरातून अभिनंदनचा वर्षाव होत आहे. दि.४ मे २०२५ रोजी बीड शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह याठिकाणी या पुरस्काराचे मान्यवरांच्या हस्ते वितरण होणार आहे.

बीड शहरातील पद्मपाणी प्रतिष्ठान यांच्यावतीने विविध क्षेत्रातील मान्यवरांचा राज्यस्तरीय पुरस्काराने प्रत्येक वर्षी गौरव केला जातो. संविधान दिनाच्या निमित्ताने दिल्या जाणाऱ्या या राज्यस्तरीय पुरस्कारांची घोषणा नुकतीच करण्यात आली असून विविध क्षेत्रातील मान्यवरांना हा पुरस्कार दिला जाणार आहे. यामध्ये प्रशासकीय क्षेत्रातून बीड जिल्ह्याच्या शिक्षण क्षेत्रात वडवणी तालुक्याची उत्तुंग भरारी घेणारे वडवणी तालुक्याचे अभ्यासू, कर्तव्यदक्ष, कार्यतत्पर तथा शिक्षकप्रिय



गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे यांना प्रतिष्ठेचा पद्मपाणी राज्यस्तरीय पुरस्कार २०२५ (उत्कृष्ट प्रशासक) हा नुकताच जाहीर झाला असून या पुरस्काराबध्दल त्यांच्यावर शिक्षण क्षेत्रासह सर्व स्तरातून अभिनंदनचा वर्षाव होत आहे. वडवणी गटशिक्षणाधिकारी कार्यालयात सर्व कर्मचारी वृंद यांच्या वतीने पुरस्कार प्राप्त गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे यांचा काल सोमवारी स्वागत सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर तालुक्यातील इतर सर्व शिक्षक बंधू भगिनी यांनीही त्यांचे स्वागत करुन अभिनंदन केले. दरम्यान आपणांस हा पुरस्कार जाहीर झाल्याचे समजताच खुप आनंद झाला असून केलेल्या चांगल्या कामाची पोहोच या माध्यमातून मिळत आहे. दरम्यान हा पुरस्कार माझा एकट्याचा नसून यामध्ये नव्या शैक्षणिक उत्क्रांतीसाठी अहोरात्र परिश्रम घेणाऱ्या माझ्या कार्यक्षेत्रातील सर्व कर्मचारी व शिक्षक बांधवांचे शेकडो हात यासाठी लागलेले आहेत. वडवणी तालुक्यातील सर्व केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, सर्व शिक्षक बंधू-भगिनी व गटसाधन केंद्रातील सर्व कर्मचारी बांधव यांनाच हा पुरस्कार समर्पित असून त्यांच्या सहकार्यानेच वडवणी तालुक्याची सतत शैक्षणिक भरभराट होत आहे. या पुरस्काराबध्दल पद्मपाणी प्रतिष्ठानचे आभार मानतो व यापुढेही सर्वांगाने वडवणी तालुक्यातील शैक्षणिक उन्नतीसाठी, विकासासाठी कायम तत्पर राहील असेच या निमित्ताने सांगतो अशी प्रतिक्रिया पुरस्कार जाहीर झाल्यानंतर गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे यांनी व्यक्त केली.

# संतोष देशमुखांचा पुतळा उभारून शाळेला नाव देणार:बाळा बांगर

केज : प्रतिनिधी

स्वर्गीय संतोष देशमुख हे आज जरी देहाने व शरीराने आपल्यात नसले तरी त्यांचे विचार मानवतावादी व माणुसकीचे होते. त्यांचे विचार तळागाळा पर्यंत पोहचविण्या करिता व त्यांच्या स्मृती आणि केलेले कार्य कायमस्वरूपी जिवंत राहण्यासाठी शाळेला स्व. संतोष देशमुख यांचे नाव देवून शाळे समोर त्यांचा भव्य पुतळा उभा करणार असल्याचे नवनिर्माण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष विजयसिंह बाळा बांगर यांनी सांगितले. तसेच शाळेची इमारत पूर्ण झाल्या नंतर देशमुख कुटुंबियांच्या हस्ते नामकरण व शुभारंभ केला जाईल. अशी माहिती दिली.

मस्साजोग ता. केज येथे सोमवार दि. २१ एप्रिल रोजी विजयसिंह बाळा बांगर यांनी संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांची भेट घेतली. त्या नंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी धनंजय देशमुख व कुटुंब होते. पुढे बोलताना बांगर म्हणाले की, संतोष देशमुखांच्या मारेकऱ्यांना कठोर शिक्षा म्हणजे फाशी झाली पाहिजे. बांगर कुटुंब देशमुख कुटुंबा सोबत




शेवटच्या श्वासा पर्यंत आयुष्यभर राहील. तर वैभवीचा दुसरा चुलता व धनंजय देशमुख यांचा छोटा बंधू म्हणून ते काम करणार आहे. आमच्या मातोश्री सत्यभामा बांगर यांच्याशी धनंजय देशमुख यांनी फोनवर संपर्क साधून त्यांनी एकमेकांना खूप आधार दिला. संतोष देशमुख हे समाजसेवक होते. गाव आणि तालुक्या पुरतेच मर्यादित नव्हते. त्यांनी केलेले कार्य व समाज सेवेचा संदेश हा महाराष्ट्र व भारतातल्या कानाकोपऱ्यात गेला पाहिजे. असे ते म्हणाले.संतोष देशमुख यांनी शिबिरे आणि सरपंच परिषदेला सहभाग नोंदविला. त्याठिकाणी अनेकांच्या भेटी झाल्या. जर त्यांनी समाजकारण, समाजसेवा केली नसती ते स्वतःसाठी आयुष्य जगले असते तर त्यांचे एवढे मोठे नाव झाले नसते. त्यांच्या नंतर लढा उभारला गेला नसता. या न्यायाच्या लढाईत अठरा पगड जातीचे लोक सहभागी झाले नसते. परंतु आपण निसर्गाचे व समाजाचे काही देणं लागतो. म्हणून जे काही समाजकार्य आहे; ते माणूसच करू शकतो. तर त्याच माध्यमातून ते करत होते. त्यांचे विचार देशमुख कुटुंबीय, गाव आणि त्याचा मित्र परिवार पुढे घेऊन जात आहेत. तर आपला उर्वरित राहिलेला लढा आहे. आरोपींना फाशीची शिक्षा होई पर्यंत थांबायचं नाही. मुख्यमंत्र्यांनी दिलेला शब्द व राबविलेली यंत्रणा याच्यावर विश्वास ठेवून हा लढा शेवट पर्यंत न्यायचा आहे.

# प्रत्येक व्यक्तीने आपले ध्येय निश्चित केले पाहिजे- पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने

केज ; म.नेता

स्पर्धेच्या युगामध्ये जीवन जगत असताना प्रत्येक व्यक्तीने ध्येयवादी बनले पाहिजे, तरच आपल्या संकल्पांची सहज प्राप्ती होईल. ज्यांनी आपल्या मनात आशा, विश्वास, प्रयत्न आणि डोळस श्रद्धा बाळगली असेल, अशी माणसंच आपल्या जीवनध्येयाची उंच शिखरं सहज गाठू शकतात. जीवनामध्ये अनेक स्वप्न बघा पण वाटचाल करत असताना टप्प्याटप्प्याने त्याची पूर्तता करा. यासाठी आपण कठोर परिश्रम, दृढ विश्वास आणि प्रबळ इच्छाशक्ती मनात बाळगली पाहिजे. संकल्पाला आत्मविश्वासाचा आणि समर्पण वृत्तीचा सहवास लाभला तर तो सिद्धीस जातो. आपल्या जीवनाची खरी सार्थकता आशावादी दृष्टिकोन बाळगून जगण्यात आहे. खरं तर आशावादी माणसं प्रयत्नवादी असतात. प्रत्येकाची इच्छाशक्ती ही प्रबळ असली पाहिजे, इच्छाशक्ती कमी असणे हे अपयशाचे लक्षण आहे, यासाठी सर्वकश ज्ञान आत्मसात करणे गरजेचे आहे. कारण मिरीट चांगली असेल तर सन्मानही योग्य मिळतो. सध्या या तंत्रज्ञानाच्या युगामध्ये व्हाट्सअप, फेसबुक यांच्या वापर मर्यादित केला पाहिजे. अशी साधने आपल्या आरोग्यासाठी अत्यंत घातक ठरत आहेत. त्यामुळे केवळ डोळ्यांचेच नव्हे, तर इतरही आजार उद्भवत आहेत असे प्रतिपादन पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने यांनी केले.केज येथील स्वामी विवेकानंद विद्या मंदिर या शाळेमध्ये दि. २० एप्रिल वार रविवार पासून स्व. विश्वंभर कोकिळ जीवन विकास व्याख्यान मालेला नुकतीच सुरुवात झाली. यावर्षी या व्याख्यानमालेने २५ व्या वर्षात पदार्पण केले. तेंव्हा या व्याख्यानमालेचा शुभारंभ प्रमुख वक्ते पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने, सेवानिवृत्त वरिष्ठ अधिष्ठाता जे. जे. रुग्णालय, मुंबई यांच्या शुभहस्ते दिपप्रज्वलनाने झाला. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मा. लहू गळगुंडे, जिल्हा कोषागार अधिकारी बीड हे उपस्थित होते. इतर मान्यवर उपस्थितमध्ये सचिन देशपांडे, नायब तहसीलदार अंबेजोगाई, गोविंद अण्णा कद्रे, सामाजिक कार्यकर्ते बीड, नईमोद्दीन इनामदार, संस्थेचे माजी उपाध्यक्ष तसेच जीवन विकास शिक्षण मंडळ संस्थेचे अध्यक्ष अंकुशरावजी इंगळे, संस्थेचे सचिव जी. बी. गदळे, संस्थेचे संचालक नारायण अण्णा अंधारे, शाळेच्या मा. वि. च्या मुख्याध्यापिका शिवनंदा मुळे, प्रा. वि. चे मु. अ. वसंतराव शितोळे, प्राचार्य शंकर भैरट,

तसेच संस्थेचे सहसचिव तथा स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूलचे मु. अ. गणेश कोकिळ आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रस्ताविक व पाहुण्यांचा परिचय संस्थेचे सचिव जी. बी. गदळे यांनी दिला. याप्रसंगी ते म्हणाले, ही संस्था दरवर्षी विविध उपक्रम राबवते तसेच शिक्षकवृंद ही शाळेचा गुणात्मक आलेख टिकून ठेवण्यासाठी प्रयत्नशील असतात.पहिले पुष्प गुंफताना '' स्वप्न बघा स्वप्न जगा '' या विषयावर बोलताना डॉ. तात्याराव लहाने पुढे म्हणाले, जीवनामध्ये परिपक्व होण्यासाठी संस्कारक्षम शिक्षण घेतले पाहिजे. याप्रसंगी त्यांनी आपल्या जीवनातील काही आठवणींना उजाळा देण्याचा प्रयत्न केला ते म्हणाले, माझे शिक्षणही अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये झाले. जीवनामध्ये आईचे काय महत्व असते, ''आई म्हणजे समर्पण'' असे का म्हटले जाते हे त्यांनी उपस्थित श्रोत्यांना आपल्या आईच्या त्यागाबद्दल अत्यंत भावनिक होऊन सांगितले. या क्षेत्रामध्ये कार्य करत असताना बाबा आमटे यांच्याकडे जाऊन तेथील कुष्ठरोग्यावर उपचार केले, तसेच गडचिरोली, मेळघाट इथेही सेवा देण्याची संधी मिळाली. मागील जवळपास २६ वर्षात साडेचार लाख मोफत शस्त्रक्रिया केल्या. तसेच पन्नास लाख याचकांना दृष्टी देण्याचं अलौकिक कार्यही केले. सध्याच्या काळात विविध आजारांचा प्रादुर्भाव वाढत आहे, डायबिटीज विषयी सांगताना ते म्हणाले, जिभेवर नियंत्रण ठेवा, हृदयाला जपा व किमान तीन किलोमीटर नियमित चाला. कारण शरीर स्वास्थ्य हे निरोगी ठेवणं काळाची गरज आहे.

अध्यक्षीय समारोपात लहू गळगुंडे म्हणाले, प्रबोधनासाठी अशी व्याख्याने आयोजित करणे अत्यावश्यक आहे. यातून जीवन जगण्याची योग्य दिशा मिळते. तसेच जीवनातील अनंत अडचणींना सामोरे जाण्याचे बळ ही मिळते. जीवन जगण्याच्या विविध पद्धती असतात, सुरुवातीच्या काळामध्ये शिक्षणासाठी गुरुकुल ही व्यवस्था होती, आता ही संकल्पना कुलगुरू पर्यंत आली. ध्येय म्हणजे जगणं होय. सध्याच्या काळामध्ये प्रचंड ज्ञानाचे भांडार उपलब्ध आहे. तेंव्हा प्रत्येकाला आपल्या आवडीनुसार करिअर घडविण्याची पूर्णपणे संधी आहे. तेंव्हा आपल्या ध्येयाला अनुसरून प्रत्येकाने वाटचाल करणे हे गरजेचे आहे.याप्रसंगी असंख्य श्रोत्यांनी उपस्थिती दर्शवली तसेच पत्रकार बंधूही मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रबोधकांत समुद्रे यांनी केले तर आभार रघुनाथ चौरे यांनी मानले.

# सामाजिक न्याय विभागाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करा:ना.रामदास आठवले

लातूर : प्रतिनिधी

केंद्र आणि राज्य शासनाच्या सामाजिक न्याय विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या योजनांचा लाभ जिल्ह्यातील प्रत्येक पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवावा. या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत, अशा सूचना केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी दिल्या. लातूर येथील नवीन शासकीय विश्रामगृहाच्या सभागृहात आयोजित विविध योजनांच्या आढावा बैठकीत ते बोलत होते.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, महानगरपालिकेचे प्रभारी आयुक्त देविदास जाधव, जिल्हा समाज कल्याण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक प्रमोद शिंदे आणि तहसीलदार सौदागर तांदळे उपस्थित होते.

सामाजिक न्याय विभागामार्फत अनुसूचित जाती आणि नवबौद्ध घटकांतील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना राबविली जाते. तसेच, मुला-मुलींसाठी शासकीय वसतिगृहांची सुविधा उपलब्ध आहे. या योजनांचा लाभ जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना मिळावा. कोणताही पात्र विद्यार्थी



यापासून वंचित राहू नये,असे आठवले यांनी सांगितले. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत दाखल गुन्ह्यांचा आढावाही त्यांनी घेतला.दिव्यांग बांधवांसाठी राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांतून त्यांना सहाय्यभूत साधनांचे वाटप करावे, असे त्यांनी सांगितले. आंतरजातीय विवाह प्रोत्साहन योजना, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना, आवास योजना, रमाई आवास योजना, उज्ज्वला योजना, प्रधानमंत्री जनधन योजना, प्रधानमंत्री मुद्रा योजना, सफाई कामगारांसाठीच्या योजना, अटल पेन्शन योजना आणि आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना यांचा आढावा त्यांनी घेतला.लातूर जिल्ह्यात मुलींची १३ आणि मुलांची १२ अशी एकूण २५ शासकीय वसतिगृहे कार्यरत असून त्यांची एकूण प्रवेश क्षमता २ हजार ८४५ आहे. सन २०२४-२५ मध्ये जिल्ह्यातील २ हजार ८७६ विद्यार्थ्यांना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा लाभ देण्यात आला आहे. यावर्षीपासून तालुकास्तरावरही ही योजना राबविली जाणार असल्याचे समाज कल्याण सहायक आयुक्त शिवकांत चिकुर्ते यांनी सांगितले.

गतवर्षी इयत्ता पहिली ते दहावीपर्यंतच्या ३३ हजार १६१ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ देण्यात आला. तसेच, दिव्यांग बांधवांसाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. आंतरजातीय विवाह प्रोत्साहन योजनेतून गेल्या तीन वर्षांत ११६ दाम्पत्यांना प्रत्येकी ५० हजार रुपयांचे सहाय्य देण्यात आल्याचे जिल्हा समाज कल्याण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी यांनी सांगितले.

**जाहिरनामा**

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.२२/०४/२०२५

अर्जदाराचे नाव - श्री. दत्ता दगडू कुरकुटे

विक्री किंवा नावे करुन देणाऱ्याचे नाव- श्रीमती. कौशल्या दगडू कुरकुटे

प्रकरण : नाव नोंदणी बाबत मिळकत क्र. ४८५ वडवणी येथील आहे.

सर्व जनतेस जारीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारस प्रमाणपत्र आधारे या कार्यालयातील मालमत्ता कर आकारणी नोंद मध्ये नोंद घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चर्तुः सिमा खालीलप्रमाणे आहे.

आकार- पुर्वपश्चिम २६ फुट दक्षिणोत्तर २३ फुट एकुण क्षेत्रफळ ५९८ चौ. फुट, पुर्व - बंडू कुरकुटे, पश्चिम - रस्ता, दक्षिण - दशरथ डिगे

उत्तर - कौशल्या दगडू कुरकुटे

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द केल्यापासुन मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी,**
**नगरपंचायत, वडवणी**

साप्ताहिक
# डोंगरचा राजा
बुधवार, दि.२३ एप्रिल २०२५ । पान ४

# बीड ते वडवणी रेल्वे इंजिन चाचणी यशस्वी

वडवणी :प्रतिनिधी

गेल्या अनेक वर्षांपासून अहिल्यानगर- बीड- परळी रेल्वे रुळाचे काम सुरू आहे. यामध्ये अहिल्यानगर ते बीड रेल्वे रुळाचे काम पूर्ण झालेले असून पुढील टप्पा बीड- वडवणी रेल्वे रुळाचे काम पुर्ण झाले आहे. रेल्वे बोर्डाकडून बीड ते वडवणी रेल्वे इंजिन चाचणी घेण्यात आली असून ताशी १० गती प्रमाणे यशस्वी चाचणी झाली आहे. वडवणीला प्रथमच रेल्वे इंजिन आल्याने नागरिकांनी हर्ष उल्हासात स्वागत करत पुजन करून आनंदोत्सव साजरा करण्यात आला आहे.

अनेक वर्षांच्या प्रदीर्घ काळानंतर प्रथमच बीड ते वडवणी पर्यंत रेल्वे रूळावरून रेल्वे इंजिन धावले आहे. वडवणी रेल्वे स्थानकावर वडवणीकरांनी रेल्वे इंजिनची पुजा करुन रेल्वे बोर्डाचे अधिकारी यांचे स्वागत केले आहे. अहिल्यानगर-बीड-परळी रेल्वे रुळाचे काम जलद गतीने सुरू असून यामध्ये अहिल्यानगर ते बीड रेल्वे रुळाचे काम पूर्ण झालेले असून यावर काही महिन्यापूर्वी जलद रेल्वेची चाचणीही पूर्ण झालेली असून आता बीड ते वडवणी या रेल्वे मार्गावरील रुळाचे आथरण्याचे काम पूर्ण झाले असून अहमदनगर येथून बीड रेल्वे स्टेशनवर रेल्वे इंजिन मालवाहतूक डब्यासह दाखल झालेले होते. यामध्ये सोमवार रोजी बीड येथून बिंदुसरा नदीच्या रेल्वेच्या पुलावरून हे इंजिन दहाच्या स्पीडने वडवणी पर्यंत झालेल्या मूळ मार्गावर धावले असून यामध्ये बीड ते वडवणी पर्यंत रेल्वे इंजिनच्या चाचणी घेण्यात आली आहे. बीड जिल्हा




वाशियांचे रेल्वे मध्ये बसण्याचे स्वप्न काही काळात पूर्ण होणार असून यामध्ये बीड ते वडवणी रेल्वे मार्गावर इंजिनची धावण्याची चाचणी झाल्याने या मार्गातील गावकऱ्यांनी आनंद व्यक्त केला आहे. बीड वडवणी नवीन रेल्वे मार्गाच्या चाचणी अंतर्गत रेल्वे इंजिन वडवणी रेल्वे स्थानकावर पोहोचले. हा क्षण वडवणीसाठी ऐतिहासिक आणि गौरवाचा ठरला. या प्रसंगी उपस्थित कार्यकर्ते, पदाधिकारी यांनी इंजिनची पुजा करत उपस्थित रेल्वे अधिकाऱ्यांचे स्वागत केले. या स्वागत सोहळ्यास संजय आंधळे, ईश्वर तांबडे, सुरेश भोरे, अमोल मस्के, बंडू नाईकवाडे, नगरसेवक अरुण मुंडे, पत्रकार बाबुराव जेधे, पत्रकार अविनाश मुजमुले, पत्रकार सतिश मुजमुले, संभाजी दराडे, अँड.भास्कर उजगरे, धनराज मुंडे, विक्रम चव्हाण, सह आदी उपस्थित होते.

# प्रसिद्ध गायक उत्कर्ष शिंदे यांच्या भीमगितांचा दणदणीत कार्यक्रम

## हजारों समाजबांधवांनी लावली हजेरी; जयंती उत्सव समितीचे उत्कृष्ट नियोजन

वडवणी : प्रतिनिधी

शहरांमध्ये प्रसिद्ध गायक उत्कर्ष शिंदे यांचा वाणीतून भीम गीतांचा दणकेबाज कार्यक्रम पार पडला या भीम गीतांचा आस्वाद घेण्यासाठी तालुका घरातून हजारो समाज बांधव डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकामध्ये उपस्थित झाले होते.

याबाबत अधिक वृत्त असे की, वडवणी शहरातील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौकामध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या निमित्ताने प्रसिद्ध गायक डॉक्टर उत्कर्ष शिंदे यांच्या वाणीतून निघणाऱ्या दणकेबाज भीम गीत गायनाचा कार्यक्रम मंगळवारी रात्री हजारो समाज बांधवांच्या उपस्थितीमध्ये संपन्न झाला. जयंती उत्सव समितीच्या वतीने उत्कृष्ट असं नियोजन केले गेले. महिलांसाठी व पुरुषांसाठी स्वतंत्र व्यवस्था केली गेली. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला नगराध्यक्ष शेषेराव जगताप यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलीस निरीक्षक अमन सिरसट यांनी



स्टेजवरून सर्वांना शांततेचे आवाहन केले. प्रसिद्ध गायक उत्कर्ष शिंदे यांच्या वाणी मधून देशभरात प्रसिद्ध असणारे अनेक भीम गीते सादर करण्यात आली.

त्याचबरोबर उपस्थित वृद्ध महिलांना स्टेजवर बोलावून रमाई चे सुंदर गीत सादर केले. जयंती उत्सव समितीच्या वतीने ठरविण्यात आलेले दोन कार्यक्रम म्हणजेच १४ एप्रिल रोजी ध्वजारोहण आणि हजारो नागरिकांना भोजनदान कार्यक्रम घेतला. त्याचबरोबर काल पार पडलेला डॉक्टर उत्कर्ष शिंदे यांचा भीम गीतांचा दणकेबाज कार्यक्रम सुद्धा अत्यंत शांततेच्या वातावरणात संपन्न झाला. आता येत्या ३० एप्रिल रोजी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढली जाणार असून या मिरवणुकीच्या निमित्ताने कमिटीच्या वतीने भरगच्च नियोजन केले गेले आहे. या जयंतीची मिरवणूक लोकशाहीर आण्णाभाऊ साठे चौकातून निघणार असून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या चौका मध्ये संपन्न होणार आहे. त्यामुळे जसा भीम गीत गायनाच्या कार्यक्रमास तालुक्यातील नागरिकांनी उपस्थित राहुन सहकार्य केले. अगदी त्याचप्रमाणे हजारो नागरिक व महिला भगिनींनी मिरवणुकीत सहभागी होऊन डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यास अगत्याने यावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# उसतोड कामगार नोंदणी वाढ होण्यासाठी प्रयत्न करा

## विधानसभा उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांनी घेतला आढावा

बीड : प्रतिनिधी

जिल्हयात उसतोड कामगारांची संख्या खूप मोठी आहे. मात्र याबाबतची नोंदणी कमी आहे त्यामुळे या कामगारांच्या नोंदणीसह प्रधान्य द्यावे त्यासोबत या कामगारांच्या घरातील महिला आणि मुलींच्या आरोग्याची तपासणी होईल याचीही व्यवस्था करा असे निर्देश राज्य विधानसभा उपसभापती निलम गो-हे यांनी आज येथे दिले.

जिल्हयातील दौ-यात आज विविध विभागाच्या कामांचा आढावा त्यांनी आज घेतला यावेळी जिल्हाधिकारी अविनाश पाठक, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जिवने यांच्यासह विविध विभागाच्या प्रमुख अधिका-यांची उपस्थिती होती.

यापूर्वी त्यांनी जिल्हा पोलिस अधिक्षक नवनीत कॉवत यांच्याकडून महिला सुरक्षाविषयक बाबींचा एका बैठकित आढावा घेतला. मुली विशेषत: शालेय व महाविद्यालयीन मुलींना छेडछाड करण्याचे प्रमाण वाढले आहे यातच येथील एका मुलीने धाराशिव येथे आत्महत्या केली तिच्या कुंटुंबियांशी भेट घेऊन श्रीमती गो-हे यांनी या प्रकरणी न्याय मिळवून देऊअसे तिच्या कुंटुंबियास सांगितले. सदर मुलीच्या आईने



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मदतीसाठी आवाहन केले होते. त्या कुटुंबाला सांत्वनासह मदतीचे पूर्ण आश्वासन आज श्रीमती गो-हे यांनी दिले.मुलींसाठी /महिलांसाठी मदत क्रमांक

कोणत्याही प्रकारची छेडछाड अथवा इतर स्वरुपाचा त्रास दिला जात असेल तर त्यासाठी स्वतंत्र असा क्रमांक जारी करण्यात आला आहे.

९२२५० ९२३८९

हा तो क्रमांक असून यावर सर्वांना मदत मागता येईल तसेच तक्रार करता येणार आहे. ही माहिती पोलीस अधिक्षकांनी यावेळी दिली हा क्रमांक सर्व ठिकाणी पोहचवा असे निर्देश श्रीमती गो-हे यांनी दिले.

पाणीपुरवठा

जिल्हयात ग्रामीण भागातील पाणी पुरवठयासाठी बीड शहराच्या पाणीपुरवठयाबाबत यावेळी आढावा घेण्यात आला तालुक्यामध्ये ९० दिवस पुरेल इतका पेयजल साठा आहे.

जलजीवन योजने अंतर्गत ९४० कामे प्रगतीपथावर आहेत तथापी याची ८०० योजनांमध्ये पाणी पुरवठा सुरु देखील झाला आहे त्यामुळे सध्या टॅकरची मागणी नाही मात्र नियोजनाचा भाग म्हणून १० विहिरींचे अधिग्रहण प्रशासनाने केल्याची माहिती जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी दिली.

बीड शहराला पाणी पुरवठा अतिशय विलंबाने होतो त्यामुळे शहरात अधिग्रहण करुन विहिरीतून पाणी पुरवठयाचे नियोजन करा असे निर्देश श्रीमती गो-हे यांनी दिले.याबाबत प्रस्ताव पाठवा असेही निर्देश त्यांनी नगर परिषदेचे मुध्याधिकारी निता अंधारे यांना दिले.

गर्भपिशवी शस्त्रक्रिया

आरोग्य विभागाने राबविलेल्या उपायांमुळे जिल्हयात ३५ वर्षाखालील स्त्रियांच्या गर्भपिशवी शस्त्रक्रियांचे प्रमाण कमी झाले आहे. याबाबत उपसभापती यांनी समाधान व्यक्त केले.

याचसोबत उसतोड महामंडळातर्फे अन्य हेळ निर्माण करुन उसतोड कामगारांच्या कुटुंबियाना आरोग्य तपासणी व इतर सुविधाबाबत प्रस्ताव करा असेही त्या म्हणाल्या.

ग्रामीण रोजगार हमी योजनेत ३६५ दिवस काम दिले जाते यात केंद्रातर्फे १०० व राज्यातर्फे २६५ दिवस असे नियोजन आहे. यात जिल्हयाचे काम अतिशय चांगले आहे असे त्या म्हणाल्या.

नरेगातुन ग्रामीण भागात उद्याने आणि खेळासाठी मैदानांचा समावेश करण्याच्या दृष्टीनोकोणतुन येत्या काळात नियोजन करा असेही श्रीमती गो-हे यांनी सांगितले.



# ना. पंकजाताई मुंडेंचा प्रदेश कार्यालयात हाऊसफुल्ल जनता दरबार

मुंबईःप्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांचा भाजपच्या प्रदेश कार्यालयात आज आयोजित करण्यात आलेला जनता दरबार अक्षरशः हाऊसफुल्ल झाला. राज्यभरातून आपापल्या समस्या घेऊन आलेल्या लोकांनी यावेळी तोबा गर्दी केली होती. प्रत्येक नागरिकांना भेटून त्यांच्या समस्या जाणून घेत त्यांच्याशी संवाद साधत ना. पंकजाताईंनी त्यांच्या प्रश्नांचा जागेवरच निपटारा केला.

भाजपच्या वतीने प्रत्येक महिन्याला मंत्री महोदयांचा 'जनता दरबार' हा उपक्रम जाहीर करण्यात आला होता. या उपक्रमांतर्गत पहिला जनता दरबार घेण्याचा मान ना. पंकजाताई मुंडे यांना मिळाला. आज दुपारी ३ ते ५ वा. दरम्यान ना. पंकजाताईंनी जनता दरबार घेतला. राज्याच्या विविध भागातून आपल्या समस्या घेऊन लोकं आली होती. आलेल्या प्रत्येक नागरिकांच्या समस्या त्यांनी जाणून घेतल्या, त्यांची गाऱ्हाणी ऐकली, निवेदने स्वीकारली आणि त्यांच्या प्रश्नांचे जागेवर निराकरण केले. पर्यावरण व पशुसंवर्धन विभागासह अन्य विभागाची कामे घेऊन आलेल्या कामांचाही त्यांनी यावेळी निपटारा केला.

भाजपचा हा उपक्रम खरोखरच स्त्युत्य असा आहे, या पहिल्याच जनता दरबाराला खूप चांगला प्रतिसाद मिळाला. पक्षाच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांसह सर्व सामान्य जनतेशी थेट संवाद साधता आला असं जनता दरबार झाल्यानंतर त्यांनी माध्यमांशी बोलतांना सांगितलं.

# मराठी पत्रकार परिषदेचे ४४ वे राष्ट्रीय अधिवेशन शेगावमध्ये:एस.एम.देशमुख

## मुख्य विश्वस्त देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली शेगावात झाली पहिली आढावा बैठक

शेगावःप्रतिनिधी

मराठी पत्रकार परिषदेचे ४४ वे राष्ट्रीय अधिवेशन बुलढाणा जिल्ह्यातील संतनगरी शेगाव येथे होणार असल्याची माहिती मुख्य विश्वस्त श्री.एस.एम.देशमुख सरांनी दिली. अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर शेगाव नगरीमध्ये पहिली आढावा बैठक उत्साहात पार पडली. बैठकीत अधिवेशन यशस्वीरित्या पार पाडण्याचा विश्वास उपस्थित पदाधिकाऱ्यांनी दिला.



येत्या ऑगस्ट महिन्यामध्ये मराठी पत्रकार परिषदेचे ४४ वे राष्ट्रीय अधिवेशन हे बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव नगरीमध्ये घेण्याचा निर्णय नांदेड येथील बैठकीत झाला होता. त्यानंतर संतनगरी शेगाव मध्ये प्रत्यक्ष भेट देऊन मुख्य विश्वस्त श्री.एस.एम. देशमुख सर यांच्या अध्यक्षतेखाली ही पहिली बैठक पार पडली. यावेळी परिषदेचे प्रदेश सरचिटणीस सुरेश नाईकवाडे प्रदेश उपाध्यक्ष चंद्रकांत बरदे, डिजिटल मिडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे, प्रदेश प्रतिनिधी युवराज वाघ, प्रदेश उपाध्यक्ष अनिल उंबरकर, बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष रणजीतसिंह राजपूत, राजेश डीखोळकर, गणेश चौकशे यांची प्रमुख उपस्थिती होती. बैठकीत आगामी राष्ट्रीय अधिवेशना संदर्भात मुख्य विश्वस्त श्री.एस.एम.देशमुख सर यांनी माहिती दिली. अधिवेशन यशस्वीरित्या यशस्वी करण्याचे आव्हान यावेळी श्री.एस.एम.देशमुख सरांनी केले. या आव्हानाला प्रतिसाद देत शेगाव येथील पदाधिकारी राजेश चौधरी,धनराज ससाने,नंदू कुलकर्णी,अनिल उंबरकर यांनी आपले मनोगत व्यक्त करून परिषदेची शेगाव टीम सज्ज असून तन-मन-धनाने सहकार्य करण्याची ग्वाही दिली. त्यावर मराठी पत्रकार परिषदेचे राज्य उपाध्यक्ष चंद्रकांत बर्दे यांनी बुलढाणा जिल्हा सक्षम असून बुलढाणा जिल्हा या अधिवेशनाची सर्व ताकदीनिशी जबाबदारी उचलणार असल्याची ग्वाही देत अधिवेशन यशस्वी करण्याचा मानस व्यक्त केला. परीषदेचे प्रदेश सरचिटणीस सुरेश नाईकवाडे यांनी अधिवेशनाला ज्या ज्या अडचण येतील त्या त्या सोडवण्यासाठी सदैव तत्पर असल्याचे उपस्थितांना आश्वासित केले. परिषदेचे प्रदेश सरचिटणीस सुरेश नाईकवाडे तसेच डिजिटल मीडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांच्याकडे या अधिवेशना संदर्भात वेळोवेळी आढावा घेण्याचे आदेश यावेळी मुख्य विश्वस्त श्री.एस.एम.देशमुख सर यांनी दिले. बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष रणजितसिंह राजपूत यांनी जिल्ह्यातील तेराही तालुक्यात परिषदेच्या शाखांचे गठन झाले असून तेराही शाखेचे पदाधिकारी वेगवेगळया समितीच्या माध्यमातून अधिवेशनात सहभागी होतील अशी माहिती दिली. प्रारंभी मुख्य विश्वस्त श्री.एस.एम.देशमुख सर,सौ शोभना देशमुख, प्रदेश सरचिटणीस सुरेश नाईकवाडे प्रदेश उपाध्यक्ष चंद्रकांत बरदे डिजिटल मिडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे या पदाधिकाऱ्यांचा शेगाव तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष नंदू कुलकर्णी, उपाध्यक्ष संजय त्रिवेदी, कार्याध्यक्ष राजकुमार व्यास,कोषाध्यक्ष मंगेश ढोले, डिजिटल मीडिया परिषदेचे जिल्हा उपाध्यक्ष नारायण दाभाडे,राजवर्धन शेगावकर,शेगाव तालुका उपाध्यक्ष इस्माईल,गजानन ददगाळ आदींनी सत्कार केला. युवा क्रांती न्यूज चे संपादक विजय यादव यांनी परिषदेचे मुख्य विश्वस्त श्री.एस.एम. देशमुख सर यांच्या सह मान्यवरांचा भगवे दुपट्टे व श्री संत गजानन महाराजांची प्रतिमा भेट देऊन त्यांचा सन्मान केला.बैठकीला मराठी पत्रकार परिषद शाखा खामगाव तालुका अध्यक्ष महेश देशमुख,शहराध्यक्ष गणेश पांजाडे,संग्रामपूर तालुकाध्यक्ष विवेक राऊत,स्वप्निल देशमुख, ज्ञानेश्वर दांदळे आदीसह घाट्याखालील जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती. संचलन बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष प्रशांत देशमुख यांनी केले.

# श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रात पुण्यतिथी सप्ताहाचे आयोजन

गेवराई : अनंत कोटी ब्रम्हांडनायक राजाधिराज योगीराज परब्रम्ह सचिदानंद स्वरुप सद्गुरु अक्कलकोट निवासी श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या पुण्यतिथी सोहळ्यानिमीत्त दि.२० एप्रिल ते दि.२६ एप्रिल दरम्यान गेवराई येथील दत्त नगर येथील श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रात पुण्यतिथी सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी स्वामी भक्तांसह भाविकांनी सप्ताह सोहळ्याचा लाभ घ्यावा असे आवाहन केंद्राच्या वतीने करण्यात आले आहे.अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र दिंडोरी प्रणित गेवराई येथे दि.२० एप्रिल पासुन सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या पुण्यतिथी निमीत्त सेवा केंद्रात ७ दिवसीय सप्ताह कालावधीत ,सामुहिक गुरुचरित्र पारायण, यज्ञ याग, गणेश याग, मनोबोध याग, गिताई याग, स्वामी याग, चंडी याग, रुद्र याग, मल्हारी याग, प्रहर सेवा सह अदि धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

# जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, मी भागवत वचिष्ट शेळके वय ४६ वर्षे धंदा - शेती, रा.उपळी ता. वडवणी जि.बीड येथील रहीवाशी असुन मी शिवार मौजे मैंदा येथे जमीन गट नं. १५० मध्ये ०० हेक्टर २० आर जमीन इलियास जमील अन्सारी रा. वडवणी ता. वडवणी जि.बीड व गोपिचंद हरीभाऊ मस्के रा. बाहेगव्हाण ता. वडवणी जि.बीड यांच्याकडुन इसारपावती करारनामा नोटरी दस्त २०१/२०२४ दि. १४/०३/२०२५ रोजी अॅड. प्रकाश विठ्ठल तिडके यांच्या नोटरी कार्यालयामध्ये दस्त नोंदवला आसुन सदर जमीन इसार पावती करारनाम्याप्रमाणे खरेदी केलेली आसुन करारनाम्यात दर्शवलेल्या गट नं. १५० मधील २० आर जमीनीच्या चतुः सिमा खालील प्रमाणे, पुर्वेस पंडीत घुमरे यांची जमीन, पश्चिमेस आभिजीत अंडील व आविनाश अंडील, दक्षिणेस - घुमरे यांची जमीन, उत्तरेस बीड परळी रोड आशा आसुन या चतुःसिमेच्या आतिल मिळकत इसार पावती करारनाम्याप्रमाणे खरेदी केली आसुन सदर जमीनी बाबत इलियास जमील अन्सारी रा. वडवणी ता. वडवणी जि. बीड व गोपिचंद हरीभाऊ मस्के रा. बाहेगव्हाण ता. वडवणी जि.बीड यांचा किंवा त्यांच्या वारसांचा किंवा इतर कोणाचाही हक्क संबध नाही सदर इसारपावती आधारे खरेदी केलेल्या गट नं. १५० मधील २० आर क्षेत्रफळाची जमीन दाखवली असुन सदर जमीनी बाबत कोणाचा काही वाद, इसारपावतीआक्षेप आथवा उजर आसल्यास १५ दिवसात कळवावे. व जर तसा आक्षेप कळवला नाहीतर सदर मिळकत जाहीर प्रगटन देणार हे खरेदी करतील याची नोंद घ्यावी.

करीता हे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

दिनांक :-१८/०४/२०२५
ठिकाण :- वडवणी
जाहीर प्रगटन देणार

भागवत वचिष्ट शेळके
रा.उपळी ता.वडवणी जि.बीड
मो.नं. ९७६४८६६१०८

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक, **संपादक वाघमारे अनिल श्रीराम** यांनी प्रगती ऑफसेट, पंचशिलनगर, वडवणी, ता.वडवणी जि.बीड - ४३११४४ येथे छापून साप्ताहिक डोंगरचा राजा कार्यालय, मेन रोड, वडवणी, ता.वडवणी, जि.बीड ४३११४४ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले आहे. मो. ९४२२५९१८०५, फॅक्स : ०२४४३-२५७७८८, **निवासी संपादक : डॉ.एल.बी. वाघमारे** (*या अंकामधील प्रत्येक बातमी व लेखातील मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. वाद वडवणी न्यायालय अंतर्गत)